दैनिक
# आकर्षण
वर्धापन दिन
संपादक : विजय सांगळे

वर्ष ५ | अंक १ | सोमवार १४ सप्टेंबर २०२६ | पाने ४ | मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322




दैनिक **आकर्षण** वृत्तसमूहास वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

# तुळजाभवानी देवीच्या नव्या पालखीसाठी २०० वर्ष जुना ऐतिहासिक दांडा बुऱ्हाणनगरहून राहुरीकडे रवाना





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रीक्षेत्र बुऱ्हाणनगर येथील महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीच्या नवरात्रोत्सवानिमित्त दरवर्षीप्रमाणे नव्या पालखीच्या निर्मितीसाठी सुमारे २०० वर्ष जुना ऐतिहासिक व पौराणिक पालखीचा दांडा रविवार दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी बुऱ्हाणनगरहून राहुरीकडे रवाना करण्यात आला.

दि. ११ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होणाऱ्या नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाद्रपद शुद्ध प्रतिपदेच्या शुभ मुहूर्तावर बुऱ्हाणनगर येथील श्री तुळजाभवानी देवी मंदिरात या ऐतिहासिक दांड्याची विधिवत पूजा व आरती करण्यात आली. त्यानंतर ''आई राजा उदो उदो'' च्या जयघोषात हा पौराणिक दांडा राहुरी येथील पारंपरिक सुतार–लोहार कारागिरांकडे नव्या पालखीच्या निर्मितीसाठी रवाना करण्यात आला.

यावेळी मंदिराचे प्रमुख पुजारी ॲड. विजय भगत व सौ. दुर्गा भगत, ॲड. अभिषेक भगत, कविता भगत, सुभाष भगत, सुनंदा भगत, किरण भगत, मनीषा भगत, कुणाल भगत, राजेंद्र भगत, अंजली भगत यांच्यासह भगत परिवारातील सदस्य व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना ॲड. विजय भगत म्हणाले की, महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजापूरच्या श्री तुळजाभवानी देवीच्या पालखीचा मान गेल्या एक हजार वर्षांहून अधिक काळापासून बुऱ्हाणनगर येथील भगत परिवाराकडे आहे. या पालखीचा दांडा जवळपास २०० वर्षांपासून जतन करण्यात आला असून दरवर्षी केवळ पालखीचा पाळणा नव्याने तयार केला जातो. नव्या पालखीच्या निर्मितीसाठी लागणारे सर्व साहित्य भगत परिवाराकडून राहुरी येथील कारागिरांना दिले जाते. ही परंपरा भगत परिवार वंशपरंपरेने अखंडपणे जपत आहे.

ॲड. अभिषेक भगत यांनी सांगितले की, नव्या पालखीचा पाळणा तयार झाल्यानंतर दि. २६ सप्टेंबर २०२६ पासून पालखी सोहळ्यास प्रारंभ होणार आहे. राहुरी, पारनेर आणि नगर तालुक्यातील सुमारे ४० गावांमध्ये ही पालखी सालाबादप्रमाणे भ्रमण करून नवरात्रीच्या तिसऱ्या माळेस बुऱ्हाणनगर येथील मंदिरात परत येते. त्यानंतर ही पालखी श्रीक्षेत्र तुळजापूरकडे रवाना केली जाते. दसऱ्याच्या दिवशी सीमोल्लंघनासाठी साक्षात तुळजाभवानी देवी या पालखीत विराजमान होत असल्याची भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे या पालखीत देवीची कोणतीही मूर्ती अथवा छायाचित्र ठेवले जात नाही. ज्या गावांमध्ये ही पालखी जाते, तेथे भव्य यात्रा भरविली जाते आणि हजारो भाविक या सोहळ्यात सहभागी होतात. यावेळी अजिंक्य भगत, ॲड. रोहन भगत, ॲड. संकेत भगत, अंकिता भगत, वैभवी भगत, पूजा भगत, शिवानी भगत, क्षताक्षी भगत, वेदिका भगत, वेद भगत, आराध्या भगत, सिया भगत* यांच्यासह अनेक भाविक उपस्थित होते.

# गुणवंत विद्यार्थ्यांचे यश कौतुकास्पद; स्पर्धा परीक्षांमुळे विद्यार्थ्यांच्या जडणघडणीला बळ – रामचंद्र दरे

## ज्ञानवर्धिनी शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार सोहळा उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या ज्ञानवर्धिनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचा सत्कार सोहळा करवीर चौथे छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, अहिल्यानगर येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. रामचंद्र दरे होते.

अध्यक्षस्थानावरून बोलताना श्री. रामचंद्र दरे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक करून सर्वांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक युगात विविध परीक्षांमध्ये सातत्याने यश मिळवावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमास संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, ज्येष्ठ विश्वस्त श्री. जी. डी. खानदेशे, विश्वस्त श्री. जयंत वाघ, रेसिडेन्शिअल विद्यालय, अहिल्यानगरचे प्राचार्य श्री. विजय जाधव व उपप्राचार्य श्री. दादासाहेब वांढेकर व विविध शाखा शाळा मुख्याध्यापक व शिक्षक यांची प्रमुख उपस्थिती होती.

इयत्ता सहावीच्या परीक्षेत ३०० पैकी ३०० गुण मिळवत रेसिडेन्शिअल हायस्कूलची कु. सम्राज्ञी टेमकर हिने प्रथम क्रमांक मिळविला. तर इयत्ता सातवीमध्ये जनता विद्यालय, रुईछत्तीशी येथील कु. समीक्षा जगदाळे हिने प्रथम क्रमांक पटकावला. या गुणवंत विद्यार्थ्यांसह यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी ॲड. दीपलक्ष्मी म्हसे यांनी स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास व जडणघडणीस मोठी मदत करतात, असे नमूद केले.

ज्येष्ठ विश्वस्त श्री. जी. डी. खानदेशे यांनी ज्ञानवर्धिनी संस्थेचा 'जिल्हा मराठा पॅटर्न' शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी उपयुक्त असल्याचे सांगितले. यावेळी इयत्ता पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धिनी परीक्षेच्या मार्गदर्शक पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्था निरीक्षक श्री. हरिभाऊ जावळे यांनी केले. सूत्रसंचालन श्रीमती सुरुची दरे व श्री. प्रशांत ढगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संस्था निरीक्षक श्री. उत्तम राजळे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकन्यायालयात मोटार अपघात प्रकरणात ४४ लाखांची नुकसानभरपाई

## तडजोडीने प्रकरण निकाली मयत मानसी शर्मा यांच्या वारसांना धनादेश प्रदान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर व जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोकन्यायालयात मोटार अपघात नुकसानभरपाईच्या एका प्रकरणात मयत मानसी हेमंत शर्मा यांच्या वारसांना तब्बल ४४ लाख रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली. अर्जदारांच्या वतीने ॲड. श्री. राहुल झावरे व ॲड. श्रीमती स्नेहा राहुल झावरे यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. विमा कंपनी व अर्जदार यांच्यात आपसात तडजोड होऊन ४४ लाख रुपयांची नुकसानभरपाई निश्चित करण्यात आली. त्याबाबतचे तडजोडपत्र राष्ट्रीय लोकन्यायालयात नोंदविण्यात आले.

लोकन्यायालयाच्या आदेशानुसार आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्शुरन्स कंपनीकडून मयत मानसी शर्मा यांच्या वारस मायादेवी शर्मा यांना नुकसानभरपाईच्या रकमेचा धनादेश प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब श्री. शिवाजी कचरे, अहमदनगर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा न्यायाधीश–१व अतिरिक्त सत्र न्यायाधीश साहेब श्री. आर. एस. गुप्ता, यांच्या हस्ते संबधित वारसांना प्रदान करण्यात आला. यावेळी श्री. के. एस. कुलकर्णी, जिल्हा न्यायाधीश–६, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, वाय. एस. पैठणकर, पॅनल विधीज्ञ ॲड. श्री. फारुक शेख, अर्जदारांचे वकील ॲड. श्री.राहुल झावरे व ॲड. श्रीमती स्नेहा राहुल झावरे, विमा कंपनीच्या वतीने ॲड. श्रीमती सुजाता गुंदेचा, ॲड. श्री. शहादेव जगताप, सुधा भगत तसेच आयसीआयसीआय लोम्बार्ड इन्शुरन्स कंपनीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हा न्यायाधीश–१व अतिरिक्त सत्र न्यायाधीश साहेब श्री. आर. एस. गुप्ता, यांनी सांगितले की, आपसातील तडजोडीच्या माध्यमातून प्रकरणे निकाली काढल्यास अर्जदार तसेच विमा कंपनी या दोन्ही पक्षांना त्याचा लाभ होतो. वाद तडजोडीने मिटल्यामुळे न्यायव्यवस्थेवरील प्रलंबित प्रकरणांचा ताण कमी होण्यास मदत होते. त्यामुळे न्यायालयाला इतर प्रकरणांमध्ये अधिक प्रभावीपणे न्याय देता येतो. तसेच मोटार अपघात प्रकरणातील अर्जदारांना नुकसानभरपाईची रक्कम लवकर मिळाल्याने त्यांच्या पुढील आयुष्यात आर्थिक स्थैर्य निर्माण होण्यास मदत होते. त्यामुळे सर्व पक्षकार व विमा कंपन्यांनी परस्पर सामंजस्यातून वाद निकाली काढण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.



### कोतकर कुटुंबातील सदस्य

# चि. उदयनराजे व कु. श्रुतिका कोतकर उच्च शिक्षणासाठी लंडन येथे रवाना

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केडगाव येथील उद्योजक भानुदासजी कोतकर यांचे नातू तसेच संदीप उद्योग समूहाचे संचालक व माजी महापौर संदीपदादा कोतकर यांचे चिरंजीव उदयनराजे आणि कन्या श्रुतिका हे पुढील उच्च शिक्षणासाठी लंडन येथे नुकतेच रवाना झाले आहेत.

चि. उदयनराजे लंडन येथे बिझनेस मॅनेजमेंट अभ्यासक्रमाचे अत्याधुनिक प्रशिक्षण घेणार आहेत. कु. श्रुतिका मास्टर ऑफ इंटेरियर डिझाईनचे अत्याधुनिक प्रशिक्षण घेणार आहे. हे दोन्हीही अभ्यासक्रम दोन वर्षांचे आहेत, अशी माहिती कोतकर परिवारातर्फे देण्यात आली.

चि. उदयनराजे व कु. श्रुतिका यांना लंडन येथे रवाना होण्यासाठी मुंबई येथून विमान होते. यावेळी विमानतळावर त्यांना निरोप देण्यासाठी कोतकर परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते. यावेळी त्यांना कोतकर परिवार तसेच हितचिंतकांच्यावतीने भावी यशासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# सिद्धटेक–कोर्टी रस्त्याला 'उत्कृष्ट रस्ता' पुरस्काराचा मान

## रा.मा. ६८ च्या दर्जेदार कामाची राज्यस्तरीय दखल; २४ महिन्यांचे काम अवघ्या २० महिन्यांत पूर्ण
## विधानपरिषद सभापती ना. प्रा राम शिंदे यांच्या प्रयत्नमुळेमंजूर झालेला रस्ता

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कर्जत तालुक्यातील सिद्धटेक ते कोर्टी या महत्त्वाच्या मार्गावरील दौंडकरमाळापरांडाबार्शीधाराशिव रस्ता (रा.मा. ६८) सुधारणा कामाला महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०२५२६ मधील 'उत्कृष्ट रस्ता' पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. विधानपरिषद सभापती ना. प्रा राम शिंदे यांच्या प्रयत्नमुळे हा रस्ता मंजूर झाला होता.या पुरस्कारामुळे या मार्गाच्या दर्जेदार बांधकामासह प्रभावी आणि वेळेत झालेल्या कामकाजाला राज्यस्तरावर अधिकृत पावती मिळाली आहे.



कर्जत तालुक्यातील दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या रस्त्याच्या सुधारणा कामासाठी विधानपरिषद सभापती ना प्रा राम शिंदे यांच्याकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. या प्रयत्नांना यश येऊन कामाला मंजुरी मिळाली आणि त्यानंतर आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्याने महाराष्ट्र राज्य रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत या रस्त्याचे सुधारणा काम प्रत्यक्षात मार्गी लागले.

सिद्धटेक, पुणे जिल्हा हद्द ते कोर्टी, सोलापूर जिल्हा हद्द या मार्गावरील रस्ता सुधारणा कामात बांधकामाचा दर्जा, रस्त्याची गुणवत्ता, टिकाऊपणा आणि कामाची प्रभावी अंमलबजावणी यावर विशेष भर देण्यात आला. कर्जत तालुक्यासह परिसरातील नागरिक, व्यापारी, शेतकरी तसेच प्रवाशांच्या दळणवळणासाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे.

**अष्टविनायक भक्तांसाठीही महत्त्वाचा मार्ग**

सिद्धटेक हे अष्टविनायकांपैकी श्री सिद्धिविनायक गणपतीचे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असल्याने राज्याच्या विविध भागांतून दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक येथे दर्शनासाठी येतात. त्यामुळे या मार्गाची वाहतूक आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने असलेली उपयुक्तता अधिक वाढते. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर या महत्त्वाच्या मार्गाला 'उत्कृष्ट रस्ता' पुरस्कार मिळणे विशेष समाधानाची बाब ठरली आहे.

**२४ महिन्यांचे काम अवघ्या २० महिन्यांत पूर्ण**

या रस्ता सुधारणा कामासाठी निर्धारित करण्यात आलेली मुदत २४ महिने होती. मात्र, कामाची प्रभावी अंमलबजावणी आणि संबंधित यंत्रणांच्या समन्वयामुळे हे काम अवघ्या २० महिन्यांत पूर्ण करण्यात आले. काम पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना या मार्गाचा नियमित लाभ मिळत आहे. रस्ता सुधारणा काम पूर्ण होऊन त्याचा वापर सुरू झाल्यानंतर आता या कामाला शासनाच्या निर्धारित निकषांनुसार 'उत्कृष्ट रस्ता' म्हणून मिळालेला पुरस्कार हा केवळ सन्मान नसून रस्त्याच्या गुणवत्तेची अधिकृत पावती मानली जात आहे.

**पाठपुराव्याला गुणवत्तेच्या सन्मानाची जोड**

ज्या कामासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला, त्या कामाला मंजुरी मिळाली, निर्धारित मुदतीपूर्वी काम पूर्ण झाले आणि आता त्याच कामाचा राज्यस्तरावर गौरव झाला आहे, याचे विशेष समाधान होत असल्याची भावना विधानपरिषद सभापती ना प्रा राम शिंदे यांनी व्यक्त केली. ''रस्ता आधीच पूर्ण झाला होता; आज मिळालेला पुरस्कार ही त्या कामाच्या गुणवत्तेची पावती आहे,'' अशी भावना यानिमित्ताने व्यक्त करण्यात आली.

सिद्धटेककोर्टी मार्गाला मिळालेल्या या पुरस्कारामुळे कर्जत तालुक्यातील पायाभूत सुविधांच्या विकासाला आणि नागरिकांच्या दळणवळणाला मिळालेल्या प्राधान्याची राज्यस्तरीय दखल घेतली गेल्याचे अधोरेखित झाले आहे. आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र राज्य रस्ते सुधारणा प्रकल्प (भाग–२) अंतर्गत –१० दौंड करमाळा परांडा बार्शी उस्मानाबाद रस्ता रामा ६८ (सिद्धटेक पुणे जिल्हा हद्द ते कोर्टी सोलापूर जिल्हा हद्द, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर)'' या रस्त्याच्या कामास उत्कृष्ट दर्जा, तांत्रिक कौशल्य आणि दर्जेदार बांधकामासाठी ''उत्कृष्ट रस्ता'' पुरस्कार मिळाल्याबद्दल इंजि,भरत कुमार बाविस्कर अधीक्षक अभियंता, इंजि.लक्ष्मीकांत जाधव ,कार्यकारी अभियंता तसेच सार्वजनिक बांधकाम उपविभाग,कर्जत इंजि. प्रशांत वाकचौरे सहाय्यक अभियंता श्रेणी–१ ,सुभाष वाघमारे साहेब व त्यांच्या संपूर्ण टीमचे परिश्रम असून आपल्या अथक परिश्रमामुळे आणि उत्कृष्ट नियोजनामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील या महत्त्वाच्या प्रकल्पाचा राज्यपातळीवर गौरव झाला आहे. ही संपूर्ण सार्वजनिक बांधकाम अहिल्यानगर विभागासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे.

# विधान परिषद ई-ऑफीस प्रणालीमुळे २२ हजारावर प्रकरणांवर कार्यवाही

## प्रशिक्षणानंतर कामकाज झाले गतिमान

**मुंबई–** विधान परिषदेत नव्याने सुरू करण्यात आलेल्या ई–ऑफीस प्रणालीमुळे तब्बल २२ हजार ७८३ विषयांवर कार्यवाही झाली आहे. सभापती प्रा. राम शिंदे यांच्या पुढाकारातून सचिवालयातील अधिकारी व कर्मचार्यांना ई–ऑफीस प्रणालीचा वापर करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले होते. त्यानंतर राज्यभरातील नागरिकांशी संबंधित बहुतांश विषय मार्गी लागल्याने विधान परिषदेचे कामकाज गतिमान होऊ लागले आहे.

शासकीय कामकाजात संगणकाचा वापर करुन शासकीय कामकाज गतिमान व्हावे, कामकाजात सुसूत्रता यावी, दस्ताऐवज व माहिती सुरक्षित, त्वरेने व जलद गतीने प्राप्त होऊन निर्णय प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी सभापती प्रा. शिंदे यांनी पुढाकार घेतला व सचिवालयातील कामकाजात ई–ऑफिस प्रणालीचा प्रभावी वापर करून ही प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी त्यांनी सूचना दिल्या व नंतर सभापती कार्यालयाकडून वारंवार पाठपुरावाही करण्यात आला. त्यानंतर सचिवालयातील अधिकारी व कर्मचारी यांना ई–ऑफीस प्रणालीचा वापर करण्याबाबत प्रशिक्षण देण्यात आल्यानंतर मागील वर्षीच्या ऑक्टोबरपासून सचिवालयातील सर्व शाखांतर्गत तयार होणार्या नवीन फाईल्स (नस्त्या) ई–ऑफीस प्रणालीद्वारे सादर करण्याच्या सूचना दिल्याने त्यानुसार कार्यवाही सुरू झाली आहे.

सभापती प्रा. शिंदे यांच्या कार्यकाळातील कामकाजाचा आढावा घेताना, जानेवारी २०२५ ते जानेवारी २०२६ या वर्षभराच्या कालावधीतील ई–ऑफीस प्रणालीद्वारे सचिवालयात १ हजार ६१२ प्रकरणांवर कार्यवाही करण्यात आली होती. त्यानंतर यंदाच्या वर्षी दि.१३ जानेवारी ते ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीत २२ हजार ७८३ एवढ्या प्रकरणांवर ई–ऑफीस प्रणालीद्वारे कार्यवाही झाली आहे. ही प्रणाली अत्यंत सक्षमपणे विधानभवन येथे सुरू असून त्यामुळे कार्यालयीन कामकाजाची कार्यक्षमता वाढण्यास मदत होऊन मंत्रालयीन स्तरावर संपर्क करणे अधिक सुकर झाले आहे. कामकाजाची हीच गती पुढेही कायम राहावी, अशा सूचनाही सभापती प्रा. शिंदे यांनी संबंधितांना दिल्या आहेत.

आमदारांनी उपस्थित केलेल्या

**प्रश्नांच्या सोडवणुकीला गती**

**डॅश बोर्डद्वारे ५५२ उत्तरांची पूर्तता**

मुंबई– विधीमंडळ कामकाजात विधानसभा व विधान परिषदेच्या आमदारांकडून अनेकविध प्रश्न मांडले जातात. या प्रश्नांच्या सोडणुकीसह त्यावर मुद्देसूद उत्तर देण्याची प्रक्रिया आता विधी मंडळातील डॅश बोर्ड उपक्रमाद्वारे अधिक गतीमान झाली आहे. आतापर्यंत शासनाच्या विविध विभागांकडून ५५२ प्रश्नांवर संबंधित आमदारांना उत्तरे पाठवण्यात आली आहे. अद्यापही अडीच हजारावर उत्तरे प्रलंबित असून, त्यावर उत्तर देण्याची कार्यवाही सुरू आहे. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी नुकतीच डॅश बोर्ड आज्ञावली कामकाजाबाबत आढावा बैठक घेऊन आमदारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याची प्रक्रिया अधिक गतिमान करण्याची सूचना दिली.

विधीमंडळातील विविध संसदीय आयुधे जसे तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चेच्या सूचना, विशेष उल्लेख सूचना, औचित्याचे मुद्दे व म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना यांचा वापर विधीमंडळ सदस्यांकडून केला जातो. या आयुधांच्या परिणामकारक वापराकरिता अधिवेशन नसलेल्या कालावधीत प्रलंबित आयुधांचा पाठपुरावा करणे आवश्यक होते. जेणेकरून विधीमंडळ सदस्यांनी उपस्थित केलेल्या राज्यातील महत्वाच्या विषयांना न्याय मिळून जनतेची कामे परिणामकारकरित्या होऊ शकतात. त्यामुळे विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या संकल्पनेतून डॅश बोर्ड आज्ञावली तयार करण्यात आली. या आज्ञावल्यांच्या प्रलंबिततेची रियल टाईम माहिती याद्वारे आता उपलब्ध होत आहे.

यापूर्वी या संसदीय आयुधांचा पाठपुरावा विधानमंडळ सचिवालयामार्फत कागदपत्रांच्या स्वरुपात करण्यात येत होता. तथापि, आता डॅश बोर्ड आज्ञावली कार्यरत झाल्याने कामकाज गतिमान झाले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दिनांक ९ जुलै २०२६ रोजी विधानभवनात डॅश बोर्ड आज्ञावली उपक्रमाचे उद्घाटन झाले. ही आज्ञावली सुरू केल्यानंतर सभापती प्रा. शिंदे यांच्याकडून तिच्या परिणामकारक वापराकरिता वारंवार पाठपुरावा करण्यात आला. त्यानुसार मुख्य सचिवांनी संबंधित विभागांच्या ३९ सचिवांना याबाबत कळविण्यात आले. तसेच मंत्रालयातील सर्व विभागांच्या ३९ समन्वय अधिकार्यांच्या बैठका घेऊन त्यांना या प्रणाली वापराबाबतचे प्रशिक्षण देण्यात आले. कागदपत्र पटलावर ठेवणे या समितीचे समिती प्रमुख म्हणून उपसभापती सचिन अहिर यांनी संबंधित सर्व विभागांची बैठक घेऊन आढावा घेतला. सभापती प्रा. शिंदे व उपसभापती अहिर यांनी याप्रकरणी केलेल्या पाठपुराव्यामुळे विधानपरिषद सभागृहाशी संबंधित आयुधांची सुरुवातीला प्रलंबित असणारी ३ हजार ३१८ निवेदने कमी झाली असून, ११ सप्टेंबर २०२६ पर्यंत मंत्रालयीन विभागांकडे विधानपरिषदेकडील आयुधांची २ हजार ७६६ निवेदने/उत्तरे प्रलंबित आहेत. डॅश बोर्डसंदर्भात आढावा घेण्यास सुरुवात झाल्यापासून विभागांकडून ५५२ निवेदने/उत्तरांची पूर्तता करण्यात आली असल्याने आमदारांनी विचारलेल्या प्रश्नांना जलदगतीने न्याय प्राप्त होण्याच्या दृष्टीने आश्वासक कार्यवाही होत आहे. दरम्यान, महत्वाच्या विभागांकडे विविध आयुधांची प्रलंबित संख्या अशी : नगरविकास –५३१, शालेय शिक्षण–३५०, गृह– ११४, सार्वजनिक आरोग्य–२५७, महसूल–७५, गृहनिर्माण–७९, सार्वजनिक बांधकाम विभाग (उपक्रम वगळून)– ४९ व उच्च व तंत्र शिक्षण–३५.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### विकास आराखड्यातील दुबार आरक्षणावर हरकती नोंदवा!

अहिल्यानगर - अहिल्यानगर



महानगरपालिकेने नगर शहरासाठी तृतीय सुधारित विकास आराखड्याचा ठराव नुकताच सर्वसाधारण सभेत मंजूर केला आहे. या सुधारित आराखड्याचे अवलोकन करताना शहराच्या विकास नियोजनासाठी विविध १८ प्रकारची आरक्षणे प्रस्तावित करण्यात आल्याचे दिसून येते. यामध्ये बसस्थानक, दफनभूमी, सामुदायिक सभागृह, शैक्षणिक सुविधा, अग्निशमन केंद्र, उद्याने, आरोग्य सुविधा, ग्रंथालय, वाहनतळ, क्रीडांगण आदींचा समावेश आहे. या विविध आरक्षणांसाठी नगर शहरातील सुमारे ४७९ क्षेत्र आरक्षित करण्यात आल्याचे ॲड. अनिकेत अनिल कुलाळ यांनी सांगितले. सन २०३९ पर्यंत शहराचा नियोजित विकास व्हावा, हा विकास आराखड्याचा प्रमुख उद्देश असल्याचे सांगताना ॲड. कुलाळ यांनी आरक्षणांच्या नकाशांचा बारकाईने अभ्यास करण्याची गरज व्यक्त केली. जुन्या व नवीन आराखड्यांची तुलना केली असता काही ठिकाणी पूर्वी आरक्षित असलेले क्षेत्र कमी करण्यात आले असून, काही नवीन क्षेत्रांचा समावेश करण्यात आल्याचे दिसून येते. मात्र, काही ठिकाणी एकाच क्षेत्रावर दुबार आरक्षण करण्यात आल्याचे निदर्शनास येत असल्याचा दावा त्यांनी केला. महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी प्रारूप विकास आराखड्यात दर्शविण्यात आलेल्या नियोजित आरक्षणांबाबत नागरिकांना त्रुटी असल्यास हरकती नोंदविण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार संबंधित नागरिकांनी आपल्या मालमत्तेची कागदपत्रे व आराखड्याची माहिती तपासून विहित मुदतीत हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन ॲड. कुलाळ यांनी केले.

### अहिल्यानगरच्या सीए अंतिम परीक्षार्थी अबुजर शेखची आंतरराष्ट्रीय भरारी

अहिल्यानगर - अहिल्यानगरच्या सीए



विद्यार्थी संघटनेचे सचिव (२०२५-२६) आणि 'लक्ष्य' या आंतरराष्ट्रीय मासिकाचे मुख्य संपादक अबुजर शेख हे बीएनबी मेडिकल डिस्ट्रिब्युटर्सचे संस्थापक समीर शेख यांचे सुपुत्र असून, त्यांच्या नेतृत्वाखाली 'लक्ष्य' मासिकाच्या माध्यमातून केलेल्या उल्लेखनीय कार्याची आता आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेली आहे. 'लक्ष्य' मासिकाची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद झाल्यानंतर त्यांच्या प्रवासात आणखी एक ऐतिहासिक टप्पा जोडला गेला आहे. श्रीलंकेतील सीए विद्यार्थी संघटनेच्या 'फ्युजन' या वार्षिकाच्या २२व्या आवृत्तीत अबुजर शेख यांची विशेष मुलाखत प्रकाशित झाली आहे. 'फ्युजन' हे वार्षिक श्रीलंका तसेच शेजारील देशांतील असामान्य प्रतिभा, उल्लेखनीय कार्य आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी ओळखले जाते. सीए विद्यार्थी संघटना, श्रीलंकेचे अध्यक्ष थिलिना पिन्सारा आणि 'फ्युजन'चे संपादकीय प्रमुख नास्बी अहमद यांनी अबुजर शेख यांची विशेष मुलाखत घेतली असून, ही मुलाखत 'फ्युजन'च्या २२व्या आवृत्तीत प्रकाशित करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, श्रीलंका तसेच शेजारील देशांतील असामान्य प्रतिभावंतांना व्यासपीठ देणाऱ्या या आंतरराष्ट्रीय वार्षिकात भारतामधून प्रथमच अबुजर शेख यांना स्थान मिळाले आहे. तसेच, सीए विद्यार्थी संघटनेच्या इतिहासात प्रथमच एखाद्या विद्यार्थ्याची मुलाखत आंतरराष्ट्रीय स्तरावरील वार्षिकात प्रकाशित झाली आहे. त्यामुळे हा सीए विद्यार्थी संघटनेच्या इतिहासातीलही एक उल्लेखनीय ऐतिहासिक टप्पा ठरला आहे.

# नाथपंथाची ज्ञानगंगा परम भाग्यानेच लाभते – नाथ संप्रदायाचे प्रवचनकार मिलिंद महाराज चवंडके

**पुणे –** नाथपंथाची ज्ञानगंगा परम भाग्यानेच लाभते, असे प्रतिपादन नाथ संप्रदायाचे प्रवचनकार मिलिंद महाराज चवंडके यांनी केले. येथील सोमवार पेठेतील नरपतगिरी चौकातील श्री संत गाडगे महाराज आश्रमात ते सत्संग सोहळ्यात बोलत होते.

मंगळवार पेठेतील श्री देवेंद्रनाथ मठीच्या श्रावण संकल्प सांगता सोहळ्याचा समारोप मिलिंद महाराज चवंडके यांच्या सुश्राव्य सत्संगाने करण्यात आला. श्री देवेंद्रनाथ मठीचे मठाधिपती प.पू.श्री.प्रेमेंद्रनाथ तथा प्रशांतभाऊ चिंचोलकर यांनी स्वागत व प्रास्ताविक करताना पवित्र श्रावण महिन्यात जप, पारायण, अखंड धुनी, शोभायात्रा आणि सामुहिक यज्ञ सोहळा प्रतिवर्षी केला जातो. हे २७ वे वर्ष आहे, अशी माहिती दिली. सौ.विद्याताई शिंदे यांनी सुरेख सूत्रसंचालन केले.

व्दैताव्दैत पिठाधिश्वर प.पू.श्री.गहनेंद्रनाथ तथा जालिंदर बोखारे यांच्या दिव्य सान्निध्यात हा सोहळा पार पडला. या सोहळ्याचे यजमानपद नितेश व सौ. प्रिती बांदल यांनी भूषविले. पौरोहित्य सौरभ पिसे, योगेश उंडाळे, चेतन माळी यांनी केले. यावेळी श्री विरुपाक्षनाथ तथा तात्या सोनवणे, श्री उमाकांत चिंचोलकर (वैराग), श्री गजानन घोरपडे यांच्यासह विविध मठांचे मठाधिपती उपस्थित होते.




मिलिंद महाराज चवंडके पुढे म्हणाले, सर्व संप्रदायांचे उगमस्थान असलेला नाथ संप्रदाय आजच्या कलीयुगातील मानवाला संकट मुक्तीचा आनंद आणि शाश्वत समाधान मिळवून देणारा आहे. नाथपंथाची ज्ञानगंगा परम भाग्यानेच लाभते. या ज्ञानगंगेच्या तिरापर्यंत येऊनही लाभ न घेणारे अभागी पहायला मिळतात. सद्गुरू श्री देवेंद्रनाथ हे आर्किटेक्ट असूनही नाथ कार्याशी समरस झाले होते. त्यांनी मढी येथील प.पू.श्रीकानिफनाथ संजीवन समाधी मंदिरात विजेची, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली. गड सुशोभिकरणाचे कार्य करताना समाधी मंदिरात प.पू. श्रीकानिफनाथ मूर्तीची प्रतिष्ठापना केली. नाथांसमोर हवन करत जीव-ब्रह्म सेवा करून अमावस्या वारीची परंपराच निर्माण केली. देवेंद्रनाथांनी मढीत शिवयाग करून नाथ कार्याला गती दिली. प्रवचनांच्या माध्यमातून देवेंद्रनाथ नाथपंथी ज्ञानयज्ञ करत. हठयोग साधना शिबिरांच्या माध्यमातून करवून घेत. त्यांचे शिष्य श्री.जितेंद्रनाथ (पू.गंगारामजी विद्ये), श्री.नागेंद्रनाथ (पू.मारूती फासे), श्री.उपेंद्रनाथ (पू. मोहन चिंचोलकर), पू. मुरली महाराज आदींनी या कार्यात भरीव योगदान दिले. प.पू.श्री देवेंद्रनाथ आणि प.पू.श्री.जितेंद्रनाथ यांच्या दिव्य सान्निध्यामुळे प.पू.श्री कानिफनाथांनी गर्भगिरीतील पहिले नाथ संमेलन माझ्या हातून करवून घेतले. श्रीकानिफनाथ माहात्म्य या रसाळ ओवीबद्ध पोथीची रचना करवून घेतली. आंतरराष्ट्रीय नाथ संमेलनात निमंत्रित वक्ता हा सन्मान मिळवून दिला. श्रीकानिफनाथ देवस्थानच्या माध्यमातून कोरोना महामारीच्या काळात सामाजिक, वैद्यकीय, गोरक्षण क्षेत्रात भरीव कार्य करवून घेतले. थेट गरजूंपर्यंत महाअन्नदान सेवा (नाथ प्रसाद) पोहोचवताना आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधीला कोरोना घालवण्यासाठी २५ लाखांचा धनादेश पाठवताना नाथ कार्य हा एकमेव ध्यास होता.

नुकतेच नाशिक जिल्ह्यातील निफाड येथेही नाथ संमेलन घेण्यासाठी चार-पाच महिने अविश्रांत परिश्रम घेतले. ते नाथांनी पाहिले. प.पू.श्री.देवेंद्रनाथांच्या आज उपस्थित असलेल्या शिष्यगणांनी निफाडच्या नाथ संमेलनात सलग ३६ तास हवन करण्याची ऐतिहासिक नाथ सेवा केली. हवन स्थळाजवळ आलेले भूत मुक्त होताना आपल्यापैकी काहींनी पाहिले. हे सर्व करताना नाथ पावलो-पावली माझ्या सोबत आहेत. माझे घर सांभाळत काळजी घेत आहेत. नाथ ठरवतील तेच भाविक माझ्या जवळ येत आहेत, हे नित्य अनुभवास येते, असे मिलिंद महाराज चवंडके यांनी प्रभावित करणाऱ्या उदाहरणांसह सांगितले.

कार्यक्रमस्थळी स्वागत सेवा प्रतिभा चिंचोलकर, प्रज्वल चिंचोलकर, प्रमोद चुंबळकर व अरूण पिसे यांनी केली. लक्षवेधी रांगोळीची सजावट सुप्रिया मुरमुरे व शलाका हिरवे या युवतींनी केली. शास्त्रोक्त हवनकुंड मोहन झेंडे यांनी तयार केले. पूजेची विधीवत मांडणी विशाल कुंभार, विजय पतंगे यांनी केली. व्यासपीठ सजावट सौरभ पिसे, ऋषिकेश सूर्यवंशी, तुषार मुरमुरे यांनी केली. सौ.अनिता संगम यांनी कौशल्य पणास लावत पुष्पहार गुंफण्याची केली. शोभायात्रेचे सुरेख नियोजन रामचंद्र पतंगे, अभय पवार, विजय कोठारी, प्रदिप चिंचोलकर, संतोष हेंद्रे, शुभम पाटील यांनी केले. स्वयंपाकगृहाची सेवा राजेंद्र वायकर, गणेश शिंदे, सचिन माळी, संदिप महाडिक यांनी तर उष्टान्न सेवा रामचंद्र पिसे, कल्पना पतंगे, शोभा मुरमुरे यांनी केली. भोजन प्रसाद वाटप सेवा अमृता माळी, दिपाली सूर्यवंशी, मिना पलांडे, माधुरी रासकर यांनी केली. नाथजींच्या सेवेत रणजित रासकर रमले. राजेंद्र वायकर, विकी पतंगे, मोहन झेंडे, माधवी चुंबळकर, उज्ज्वला पिसे, स्नेहा पाटील, दिपाली सूर्यवंशी यांनी भजन सेवेचा आनंद लूटला.

श्री देवेंद्रनाथ मठीत गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या विविध सेवांमध्ये अमित पतंगे, प्रसाद चिंबळकर, शुभम पाटील, पार्थ भुजबळ, कामिनी वायकर, सीमा हेंद्रे, रेवा संगम, ऋचा हेंद्रे, चेतना माळी, श्लोक महाडिक, स्वराली चिंबळकर आदी नाथभक्तांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत अनेकांनी सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी आपापल्यापरिने परिश्रम घेतले. अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात सोहळा संपन्न झाला.

## के. जी.महाविद्यालयात आविष्कार स्पर्धा उत्साहात संपन्न



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** के. जी.महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधनवृत्तीला व नाविन्यपूर्ण विचारांना चालना देण्यासाठी महाविद्यालयात आविष्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील नाविन्यपूर्ण संकल्पना, प्रकल्प व संशोधनपर उपक्रम सादर केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयच्या परिसर संचालिका डॉ. स्वाती मुनोत यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या प्रकल्पांचे प्रभावी सादरीकरण केले. परीक्षक डॉ. स्वाती मुनोत यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे, प्रकल्पातील नाविन्यपूर्णतेचे तसेच विषयाच्या उपयुक्ततेचे मूल्यमापन केले. आविष्कार स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनासह सर्जनशीलता, संशोधनवृत्ती आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांना संशोधन व नवोपक्रमाच्या क्षेत्रात पुढे जाण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी डॉ. वर्षा कीर्तने,डॉ. प्रशांत खोपटीकर, प्रा. स्नेहल बोरावके, प्रा. योगेश चाकोते प्रा. रोहिणी क्षीरसागर व सौ. हर्षाली रासकर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्कृष्ट प्रकल्पांची निवड करून सहभागी व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, समिती सदस्य व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अभंग, गवळण, भारुड, नृत्या चा रंगला अनोखा संगम

**सावेडी जेष्ठ नागरिक मंचच्या वतीने आयोजित नैवेद्य समर्पण**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ओम संगीत विद्यालया तर्फे नमोजी आद्या, देव देव्हार्यात नाही, क्षणभर उघडी नयन देवा, अबिर गुलाल, निजरूप दाखवावे, माता आई तुळजा आई, जेजुरीचा खंडोबा या संगीत नृत्यमय कार्यक्रमाचा रंगला अनोखा संगम. निमित्त होते सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचच्या वतीने आयोजित नैवेद्य समर्पण या संगीत नृत्यमय कार्यक्रमाचा.

ज्येष्ठ नागरिक मंच सावेडी च्या सभागृहात रंगलेल्या या संगीत मैफिलीत ओम संगीत विद्यालयाचे श्री रवींद्र उल्हारे,अनंत द्रविड व सह कलाकारांनी विविध अभंग, गौळण, भारुड गीते सादर केली.

यावेळी मंचचे अध्यक्ष शरद कुलकर्णी, बलभीम पांडव, न्यायाधीश चारू डोंगरे, एस आर जोशी, श्रीकांत नाईक, सुनंदा कुलकर्णी, कुमुदिनी बोपर्डीकर, केळकर ताई, खणकर सर, बाजीराव जाधव,स्नेहल वेलणकर मोरेश्वर मुळे, शुभदा जागीरदार चारुशीला करवंदे, ज्योती केसकर उपस्थित होते.

गणेश पूजनाने मैफिलीचा प्रारंभ झाला. दुसऱ्या सत्रात



तराना या गायन प्रकारावर अनंत द्रविड यांनी मनमोहक असे नृत्य सादर केले. त्यानंतर जात्याच्या ओव्या, दादला नको ग बाई, हे भारुड सादर केले गेले. त्यांना साथ संगत करणारे दिलीप काकडे, धनाजी पांचाळ विशाल आढागळे, तसेच सिंथेसायझर वर होते शलमुन पहिलवान यांनी केले. मयूर नृत्य करणारे द्रविड सर यांनी झाडे लावा झाडे जगवा, साक्षरता, राष्ट्रप्रेम, स्वच्छता, स्वालंबन, नात्यांमधील घट्ट वीण, आई-वडिलांचे महत्त्व यावर प्रबोधन केले.चुकले तुझे बाळ आई या भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली.

सर्व कलाकारांचा यथोचित सत्कार अध्यक्ष शरद कुलकर्णी यांनी केला. कलाकारांचा परिचय पुष्पा चितांबर, कार्यक्रमाचे सूत्रसंचलन हरिश्चंद्र थिगळे यांनी केले तर आभार पुष्पाताई कोरे यांनी मानले.

## भारत कनेक्ट फॉर बिझनेस प्लॅटफॉर्म सुरू करणारी सेंट्रल बँक ऑफ इंडिया सार्वजनिक क्षेत्रातील पहिली बँक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतातील डिजिटल बी२बी (२ - बिझनेस टू बिझनेस) पेमेंट व्यवस्था अधिक मजबूत आणि सक्षम करण्याच्या दिशेने सेंट्रल बँक ऑफ इंडियाने एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. एनपीसीआय भारत बिलपे लि. () च्या सहकार्याने भारत कनेक्ट फॉर बिझनेस हे डिजिटल व्यासपीठ सुरू करणारी सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही देशातील पहिली सार्वजनिक क्षेत्रातील बँक ठरली आहे. ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६ दरम्यान एनपीसीआय पॅव्हेलियन येथे आयोजित दिमाखदार सोहळ्यात या उपक्रमाचा अधिकृत शुभारंभ करण्यात आला.

या प्रसंगी सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी कल्याण कुमार आणि एनबीबीएलच्या व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी नूपुर चतुर्वेदी हे प्रमुख उपस्थित होते. अशी माहिती अहिल्यानगरचे सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक नरेश कुमारदुबे यांनी दिली.भारत कनेक्ट फॉर बिझनेस हे व्यासपीठ उद्योजकांसाठी एक एकात्मिक डिजिटल प्लॅटफॉर्म म्हणून काम करेल. या प्लॅटफॉर्मद्वारे व्यावसायिक आणि उद्योजक डिजिटल इनव्हॉइस तयार करू शकतील. खरेदीदार आणि विक्रेते यांच्यात त्वरित व सुरक्षित व्यवहार करू शकतील.

पेमेंट मिळवणे आणि देणे सहज शक्य होईल. संकलन आणि सेटलमेंटचे व्यवस्थापन अधिक पारदर्शक व जलद रीतीने करू शकतील. सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना () डिजिटल व्यवहार करणे अधिक सुलभ होणार आहे. यामुळे उद्योग क्षेत्रातील आर्थिक कार्यक्षमता वाढून डिजिटल पेमेंट परिसंस्थेला बळ मिळेल.

## विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय सहमंत्री शंकर गायकर यांनी घेतली भांबरकर परिवाराची सांत्वनपर भेट

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कल्याण रोड, गणेशनगर येथील विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर व एस.टी.बस चालक सतीश भांबरकर यांच्या ज्येष्ठ भगिनी कु. प्रमिला भांबरकर यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले.त्यांच्या कुटुंबीयांची विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय सहमंत्री शंकरजी गायकर यांनी सांत्वनपर भेट घेतली.

स्व.कु.प्रमिला भांबरकर यांनी डॉ. देशपांडे हॉस्पिटल, व डॉ.तांबोळी हॉस्पिटलमध्ये २५ वर्षे परिचारिका नर्स म्हणून सेवा केली.आरोग्य सेवेच्या कार्यात त्यांचे मोठे योगदान आहे.

यावेळी शंकर गायकर म्हणाले, ''सेवा परमो धर्म, मनुष्य सेवा करणे हाच खरा धर्म आहे.या प्रमाणे सेवाभाव वृत्तीने आरोग्य सेवेचे केलेले कार्य महान आहे.



स्वर्गीय प्रमिला भांबरकर यांचे कार्य प्रेरणादायी आहे.भांबरकर परिवाराला या दुःखातून सावरण्याची ईश्वर शक्ती देवो.''याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयामाचे विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, भारतीय मजदूर संघाचे प्रदीप भाटे,मयूर राजपुरोहित, मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे सहप्रमुख हरिभाऊ डोळसे,निसर्गसृष्टी गौशाळेचे गौतम कराळे,सुरेंद्र सोनवणे,भाजपचे मुकुल गंधे,भारतीय किसान संघाचे जिल्हाप्रमुख निलेश चिपाडे, आदी उपस्थित होते.

## आधार आपुलकीच्या माध्यमांतून स्थापन झालेल्या एकमेव ज्येष्ठ नागरिकांच्या गणेश मंडळाच्या कार्यकारिणीची सर्वानुमते निवड अध्यक्षपदी साबळे; उपाध्यक्षपदी तरवडे, ढोरजे

**आधार आपुलकी फाउंडेशनचा पर्यावरणपूरक व सामाजिक भान जपणारा सात दिवसांचा गणेशोत्सव**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आधार आपुलकी फाउंडेशन, अहिल्यानगरच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही सामाजिक भान जपत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सवाची सुरुवात पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळेने करण्यात आली असून, या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दरम्यान, नुकत्याच झालेल्या सभेत गणेशोत्सव २०२६ साठीच्या कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली.

यामध्ये अध्यक्षपदी श्रीमती प्रतिभा साबळे, उपाध्यक्षपदी सौ. नीलिमा तरवडे व सौ. रजनी ढोरजे, सचिवपदी श्री. एकनाथ राजळे, तर कोषाध्यक्षपदी श्रीकांत नाईक यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या माध्यमातून यंदाचा गणेशोत्सव सामाजिक संदेश, पर्यावरण संवर्धन आणि ज्येष्ठ नागरिकांचा सक्रिय सहभाग या त्रिसूत्रीवर साजरा करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.



आधार आपुलकी फाउंडेशनच्या गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे अहिल्यानगर जिल्ह्यात ज्येष्ठ नागरिकांनी स्थापन केलेले हे एकमेव गणेश मंडळ असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. त्यामुळे या गणेशोत्सवाला केवळ धार्मिक उत्सवाचे स्वरूप न राहता ज्येष्ठ नागरिकांच्या सामाजिक सहभागाचे एक महत्त्वाचे व्यासपीठ म्हणून विशेष स्थान प्राप्त झाले आहे. सात दिवसांचा हा गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करताना अनावश्यक खर्चाला फाटा देऊन 'ज्येष्ठांचा समाजहित प्रबोधनासाठी आनंदोत्सव' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवण्यात आली आसुन रोज संध्याकाळी सात दिवस अहिल्यानगर मधील मान्यवरांच्या हस्ते आरती केली जाणार आहे.

२०२२ पासून कार्यरत असलेल्या आधार आपुलकी फाउंडेशनच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. दर महिन्याला नियोजनबद्ध पद्धतीने सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक तसेच मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन केले जाते. संवाद, नव्या गोष्टी शिकण्याची संधी, दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम, सहली आणि धार्मिक पर्यटन अशा विविध उपक्रमांतून ज्येष्ठ नागरिकांना सक्रिय सामाजिक सहभागाची संधी मिळत आहे.

संस्थेच्या विविध उपक्रमांमुळे ज्येष्ठ नागरिकांसाठी आपलेपणाचे आणि मुक्त संवादाचे व्यासपीठ निर्माण झाले असून, त्यांच्या अनुभवाचा समाजासाठी उपयोग व्हावा, तसेच त्यांच्या जीवनात आनंद आणि सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ व्हावी, यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यंदाच्या गणेशोत्सवातही ज्येष्ठ नागरिकांसह त्यांच्या कुटुंबीयांचा मोठ्या संख्येने सहभाग राहणार असून, समाजातील विविध स्तरांतून नवनिर्वाचित कार्यकारिणीला पाठिंबा मिळत आहे.


दैनिक आकर्षण
सत्य • निर्भीड • निष्पक्ष
दैनिक आकर्षणचा वर्धापनदिन
सदैव यशस्वी होवो...
हार्दिक शुभेच्छा !
दैनिक आकर्षणच्या वर्धापनदिनानिमित्त
हार्दिक अभिनंदन व मन:पूर्वक शुभेच्छा!
समाजातील घडामोडींना विश्वासाई व्यासपीठ देत
पत्रकारितेच्या क्षेत्रात आपल्या कार्याचा गौरवशाली प्रवास
असाच अविरत सुरू राहो, हीच मंगलकामना!
मिच्छामी दुक्कडम्
"मन, वचन आणि कायेने माझ्याकडून जाणून-अजाणतेपणी
कोणाला दु:ख झाले असेल, तर मनापासून क्षमस्व.
मिच्छामी दुक्कडम्!"
श्री गणेश आगमनाच्या
हार्दिक शुभेच्छा!
"गणपती बाप्पा मोरया!"
विघ्नहर्ता श्री गणराय आपल्या सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी,
आरोग्य, यश आणि आनंद घेऊन येवो, हीच श्रीचरणी प्रार्थना.
शुभेच्छुक
श्री रसिकलालजी रायचंदजी संचेती
सौ. निर्मलादेवी रसिकलालजी संचेती
श्री पियुषजी रसिकलालजी संचेती
सौ. प्रांजलजी पियुषजी संचेती
कु. रितिका पियुषजी संचेती
चि. सम्यककुमार पियुषजी संचेती
(आंतरराष्ट्रीय खेळाडू)
आणि समस्त संचेती परिवार, सारोळावाला
27 वर्षांपासून विश्वासाचा प्रवास
अकाउंटच्या कामातील विश्वसनीय नाव
रितिकाज अकाउंट कन्सल्टन्सी
तपकीर गल्ली, अहिल्यानगर | 9175059996
विश्वास • अनुभव • अचूकता • सेवा


गणेश चतुर्थिच्या
हार्दिक शुभेच्छा
॥ एक शुभेच्छुक ॥


सप्तपदी मंगल कार्यालय आता
नवीन स्वरूपामध्ये 'बँक्वेट एसी हॉल'
KHARPUDE EMPIRES
सप्तपदी एसी बँक्वेट हॉल अँड केटर्स
एसी हॉल ४५०००/- उपलब्ध ■ एसी हॉल व ५०० लोकांकरिता
जेवणासह संपूर्ण पॅकेज उपलब्ध ९९,०००/-
PACKAGE 1
शुभकार्य पॅकेज
₹28000*
ते आपल्या बजेट प्रमाणे
एसी मॅरेज हॉल
कार्यक्रमानुसार संपूर्ण डेकोरेशन
केटरिंग (जेवण) १०० लोकांसाठी
वाढदिवस, नामकरण
डोहाळे जेवण, साखरपुडा
खालील सर्व सुविधांसह
PACKAGE 2
लग्न-रिसेप्शन
४५०००/-
एसी मॅरेज हॉल
स्टेज डेकोरेशन
खालील सर्व सुविधांसह
PACKAGE 3
लग्न-रिसेप्शन
९९०००/-
एसी मॅरेज हॉल
संपूर्ण डेकोरेशन
केटरिंग (जेवण) ५०० लोकांसाठी
नाष्टा १०० लोकांसाठी
खालील सर्व सुविधांसह
कार्यालयाच्या सुविधा (सर्व पॅकेज करीता)
भव्य व प्रशस्त कार्यालय
प्रशस्त डायनिंग हॉल
५० फुटांचा भव्य स्टेज
अद्ययावत रुम्स्
स्वतंत्र किचन
स्वागत कमान
जनरेटर, स्पिकर, माईक, डायस
वधुवरांसाठी आकर्षक खुर्ची
स्टेज व हॉलमध्ये एल.ए.डी. लाईटस्
आकर्षक सिलिंग डेकोरेशन
पाण्याची भरपूर व्यवस्था
इतर खुर्च्या व टेबल्स्
कार्यालयात साजरे करता येणारे कार्यक्रम
साखरपुडा
डोहाळे जेवण
एंगेजमेंट
नामकरण
बर्थडे पार्टी
गोल्डन ज्युबली
सिल्वर ज्युबली
ॲनीवर्सरी
गेट टु गेदर
किटी पार्टी
कॉन्फरन्स
सेमिनार
सँड अप पार्टी
प्रोडक्ट लॉन्चींग
सभा
प्रदर्शन
सांस्कृतिक कार्यक्रम
सामजिक कार्यक्रम
वार्षिक समारोह
स्कुल गॅदरींग
KHARPUDE EMPIRE
आयुर्वेद कॉलेज चौक, काटवन खंडोबा रोड, अहमदनगर
निलेश पंडितराव खरपुडे 98221 16625 | 98220 77741
खरपुडे फटाका डिलर
कंपनी आउटलेट शिवाकाशी
आमच्याकडे सर्व नामांकित कंपन्यांचे फटाके होलसेल दरात मिळतील...
दैनिक आकर्षण वर्धापन दिन
हार्दिक शुभेच्छा!
बुकींगसाठी संपर्क : निलेश पंडितराव खरपुडे
९८२२११६६२५/९८२२०७७७४१
सप्तपदी बँक्वेट हॉल ॲण्ड केटरर्स
आयुर्वेद कालेज चौक, काटवन खंडोबा रोड,
अहिल्यानगर


अहिल्यानगर बदलतंय
विकासाच्या वाटेवर...
दैनिक आकर्षण
वर्धापन दिन
हार्दिक शुभेच्छा!
श्री. सुरेशभाऊ बनसोडे
नगरसेवक, अहिल्यानगर महानगरपालिका


हॉटेल
श्री जय
प्रोप्रा. भैय्या गोरे
शुध्द शाकाहारी
रुईछत्तीसी, ता. नगर
नगर- सोलापूर रोड
दैनिक आकर्षण वर्धापन दिन
हार्दिक शुभेच्छा


श्री गणेश एजन्सी
महेंद्र माखिजा
९२२५७३०७७४ । ९०२८८७७७७७
झेडपी गेटजवळ, आदर्श किराणा स्टोअर
माळीवाडा एस.टी. स्टँड रोड, अहमदनगर
फोन - (०२४१) २४३७७७७ शॉप मोबा- ८१८०९२७७७७
प्रसाद - ९२२५२२२२३२
दैनिक आकर्षण वर्धापन दिन
हार्दिक शुभेच्छा


प्रदिप नामदे
मो. ९२७१७६४०००
७०२०२८४४५४
प्रोप्रा. रवी नामदे
मो. ८८५६९५७१७१
९९७५४५५२५७
आयुष
ग्लास ॲण्ड ॲल्युमिनिअम
स्लायडिंग विंडो, पार्टिशियन, कंपोझिट पॅनल,
डोअर पार्टिशियन, टफन ग्लास,
सर्व प्रकारची ग्लासची कामे करून मिळतील.
विजयनगर चौक, भिंगार, अहिल्यानगर- ४१४००१
दैनिक आकर्षण
वर्धापद दिन
हार्दिक शुभेच्छा!

दैनिक
# आकर्षण
गणपती बाप्पा मोरया
वर्धापन दिन
संपादक : विजय सांगळे

वर्ष ५ । अंक १ । सोमवार १४ सप्टेंबर २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322



# श्री विशाल गणेश मंदिरात जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांच्या हस्ते श्रींची प्राणप्रतिष्ठा

## गणेश चतुर्थीनिमित्त धार्मिक व मंगलमय वातावरणात प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न पारंपरिक, भक्तिभावाने व शांततेत नियमांचे पालन करून गणेशोत्सव साजरा करा – पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** गणेश चतुर्थीनिमित्त अहिल्यानगर शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरात जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका व त्यांच्या पत्नी गायत्री मुम्मका यांच्या हस्ते श्रींची प्राणप्रतिष्ठा धार्मिक व मंगलमय वातावरणात करण्यात आली. यावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री विशाल गणेश मंदिर देवस्थानच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष अभय आगरकर, पंडित खरपुडे, अशोक कानडे, पांडुरंग नन्नवरे, ज्ञानेश्वर रासकर, प्राध्यापक माणिकराव विधाते, नितीन पुंड, चंद्रकांत फुलारी, हरिभाऊ फुलसौंदर, विजय कोथिंबीरे, संजय चापे आदींसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका म्हणाले की, अहिल्यानगरवासीयांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा. शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरामध्ये माझ्या हस्ते श्रींची प्राणप्रतिष्ठा भक्तिभावाने व मंगलमय वातावरणात करण्यात आली. या धार्मिक सोहळ्यामुळे मन प्रसन्न झाले.

नगरवासीयांनीही पारंपरिक पद्धतीने, भक्तिभावाने, शांततेत व नियमांचे पालन करून आनंदाने गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांनी केले.

देवस्थानचे अध्यक्ष अभय आगरकर म्हणाले की, जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांच्या हस्ते श्रींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे. गणेशोत्सवानिमित्त पुढील दहा दिवस मंदिरामध्ये मोठ्या उत्साहात तसेच धार्मिक व सामाजिक वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये गणेशयाग, आरोग्य शिबिर तसेच विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचा समावेश आहे. श्री विशाल गणेश मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान असून, दरवर्षी भाविक मोठ्या संख्येने देवदर्शनासाठी येत असतात. भाविकांना श्रींचे दर्शन सुलभतेने व शिस्तबद्ध पद्धतीने घेता यावे, यासाठी देवस्थानच्या वतीने नियोजनबद्ध व्यवस्था करण्यात आली आहे, असे अभय आगरकर यांनी सांगितले.

# बडीसाजन ओसवाल युवक संघ व नगर जल्लोष, रेडीओ सिटी यांच्या शाडू मातीचे गणपती बनवा कार्यशाळेला प्रतिसाद





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री बडीसाजन ओसवाल युवक संघ आणि नगर जल्लोष (ट्रस्ट), रेडीओ सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने, प्रसिद्ध शिल्पकार बालाजी वल्लाल यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने, शाडूमातीपासून गणपती बाप्पाची मूर्ती बनवण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.या कार्यशाळेस सर्व स्तरातून उदंड असा प्रतिसाद लाभला.

या कार्यशाळेस १२५ च्या वर जणांनी सहभाग नोंदवला. कार्यशाळेचे उदघाटन नगर शहराचे आमदार श्री.संग्रामभैय्या जगताप,महापौर सौ. ज्योतीताई गाडे, श्री. संघ चे अध्यक्ष श्री. पेमराजजी बोथरा यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी आयोजक दोन्ही संस्थेच्या कार्याचे कौतुक केले.दोन्ही संस्था समजाभीमुख कार्य करण्यास पुढाकार घेत असते, असे कार्य त्यांच्या कडून नेहमी व्हावे अश्या शुभेच्छा त्यांनी दिले.यावेळी स्नेहबंधचे श्री.उद्धव शिंदे, हरियाली संस्थेचे श्री.खामकर आदी उपस्थित होते.

कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी नगर जल्लोष संस्थेचे सल्लागार प्रमुख सुहास मुळे, अध्यक्ष सागर बोगा, उपाध्यक्ष गुंजन शिंगवी, सौ.पल्लवी बोगा,खजिनदार दिपक गुंडू,सचिन बोगा,राहुल पाटोळे,प्रसन्न पाठक तसेच श्री बडीसाजन ओसवाल युवक संघचे अध्यक्ष मनोज चोपडा,सेक्रेटरी प्रविण शिंगवी,उपाध्यक्ष सचिन बडेरा,अक्षय भंडारी,सह सेक्रेटरी राहुल संचेती,सहखजिनदार संकेत राठोड,आदींनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र बालक मंदीर शाळेतील पालक शिक्षक सहविचार सभा उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या महाराष्ट्र बालक मंदिर मध्ये पालक शिक्षक सहविचार सभेत परस्पर सहकार्यांने मुलांची प्रगती साधण्यावर शिक्षक व पालकांनी भर द्यावा यासाठी सर्वतोपरी सहकार्य करू असा निर्धार सभेने व्यक्त केला.यावेळी व्याख्येते प्रा. मारूती शेळके, माजी मुख्याध्यापक सुरेश शेवाळे, मुख्याध्यापिका सौ सुनीता शेवाळे, पालक वनरक्षक राजश्री पिंपळे, डॉ.नितीन रांधवण, प्रा. संदिप गिऱ्हे, राजेंद्र लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

मारूती शेळके म्हणाले शाळेपेक्षा कुटुंबात आपल्या पाल्य अठरा तास असतो घरात मात्र त्याला अनेक अनुभव मिळतात, या अनुभवातून तो घडत असतो म्हणून आईवडील म्हणून पाल्याला घडवायचा संकल्प करू या. आईवडीलांनी संस्कार रूजवा,मुलांना घडवा, अडचणी, संकटाना न घाबरता संकटाशी सामना करायला शिकवा. अपयश पचवायला शिकवा अपयश म्हणजे माणसाला घडवण्यासाठी येणारी गोष्ट. संकट म्हणजे माणसाला शक्तीशाली बनवणारी गोष्ट आहे. त्यामुळे संकटाला घाबरायचे नाही, अपयशाने खचू जायच नाही ते आपल्या जीवनात आणू या. छत्रपती शिवाजी महाराज, एडीसन यांच्या आईनी आपले मुले अनेक संकटाशी सामन करत कशी घडवली ते सांगितले कोणत्या गोष्टीचा बाउ न करता त्यांनी यशस्वी होउ दाखवले. आज प्रत्येक पालकात चिंता असते आपले पाल्य कसा घडेल परंतू त्याला या जगाशी सामना करू दया ज्याप्रमाणे सोन्याला चकाकी येण्यासाठी व हिरे चांगला होण्यासाठी हिऱ्याला व सोन्याला झोकून दयावे लागते तसेच पाल्यालाही संकटाशी सामना करू दया.

मुख्याध्यापिका सौ. सुनीता शेवाळे म्हणाल्या पालक व मुलाचा संवाद हरवत चालला आहे पालकांनी टीव्ही,व्हाटसअॅप वर वेळ न घालवता मुलांकरीता वेळ दयायला हवा पालकासमवेत मुलही आज टीव्ही व इतर गोष्टीकडेच लक्ष देत आहे मैदानी खेळ खेळत नाही मुले ही अनुकरणप्रिय असून पालकांच्या हातातील मोबाईल त्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर नकळत पणे परीणाम करतो मुलांकरीता पालकांनी वेळ काढायला हवा यावेळी शेवाळे यांनी पालकांना मार्गदर्शक सूचना केल्या व त्यांच्या समस्याचे निराकरण केले. पालकांच्या सर्व सूचनांचा नोंदी आम्ही घेतल्या असून त्यांचा जास्तीत जास्त अंर्तभाव केला जाईल अशी ग्वाही दिली.

# डॉक्टर कॉलनीतील चिमुकल्यांनी केले लाडक्या गणरायाचे उत्साहात स्वागत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सुखकर्ता दुःखहर्ता गणरायाचे आज सर्वत्र उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात स्वागत करण्यात आले. घरोघरी गणरायाची विधीवत प्राण प्रतिष्ठापना करण्यात आली. बुरूडगाव रोडवरील डॉक्टर कॉलनी येथे नर्सरी, प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या चिमुकल्यांनी एकत्र येत आपल्या श्री बाल गणेश मंडळामार्फत लाडक्या गणपतीची उत्साहात स्वागत मिरवणूक काढली आणि गणपतीची स्थापना केली.

कॉलनीतील सर्वच मुलामुलींनी एकत्र येऊन मोठ्या सार्वजनिक मंडळांप्रमाणेच आपल्या छोटेखानी मंडपात आकर्षक सजावट करून गणपतीची प्रतिष्ठापना केली. पारंपरिक वाद्यांच्या गजरात, गुलालाची उधळण करत मुलांनी गणपती बाप्पा मोरया असा जयघोष केला. रचित मुनोत, अनया लांगोरे, पलक किंजर, कार्तिक किंजर, आयुष पवार, स्वरा म्हस्के, खुशी गाडळकर, काव्या पोटे, स्वराज गाडळकर, अथर्व म्हस्के, अनिशा लांगोरे, आराध्या म्हस्के, विराज हजारे, शाश्वती बोरूडे, इशा पोटे, आराध्या पवार ही मुले मुली या मंडळात आहेत.

मुलांच्या या आनंदात मोठेही तितक्याच उत्साहात सहभागी झाले होते. महाराष्ट्राचा धार्मिक व सांस्कृतिक उत्सव असलेल्या गणेशोत्सवात समाजातील एकोपा वृद्धिंगत होतो. संघभावना वाढते. गणेशोत्सवातील दहा दिवस विविध कार्यक्रम घेण्यात येतात. त्यामुळे लहान मुले, नवोदित कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळते. या उत्सवाचा निखळ आनंद घेत डॉक्टर कॉलनीतील चिमुकल्यांनी गणरायाचे स्वागत केले आहे. मंडळाने उत्सव काळात विविध कार्यक्रमांचे नियोजन केले आहे.

# पैठण तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करा; शेतकऱ्यांना विशेष पॅकेज द्या

## कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे निवेदन; खरीप, ऊस, मोसंबीसह पीकविमा भरपाईची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पावसाने मोठा खंड दिल्याने पैठण तालुक्यातील शेतकरी संकटात सापडला असून तालुका तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करून विशेष पॅकेज द्यावे, अशी मागणी पैठण तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांच्याकडे करण्यात आली. इंदापूर येथे कृषिमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. तालुक्यातील कापूस, तूर, सोयाबीन, बाजरी, मका, मूग, उडीद आदी खरीप पिकांचे पंचनामे करून तातडीने नुकसानभरपाई द्यावी. मागील वर्षीच्या पाणीसाठ्यावर लागवड केलेल्या ऊसाला यंदा पाणीटंचाईचा फटका बसल्याने ऊसाचे स्वतंत्र पंचनामे करून हेक्टरी मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली. पैठणची ओळख असलेल्या मोसंबी बागांनाही पाणीटंचाईचा फटका बसला असून फळांचा आकार, वजन, गुणवत्ता व उत्पादनावर परिणाम होत आहे. त्यामुळे मोसंबी व इतर फळबागांसाठी स्वतंत्र दुष्काळी पॅकेज, नुकसानभरपाई व सिंचनासाठी विशेष अनुदान द्यावे, अशी मागणी करण्यात आली.

मागील तीन-चार वर्षांपासून प्रलंबित पीकविमा नुकसानभरपाई तातडीने द्यावी तसेच यंदाच्या खरीप पीकविम्याचे पंचनामे पूर्ण करून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. दुष्काळी परिस्थितीत शेती कर्जाची सक्तीची वसुली स्थगित करून कर्जाचे पुनर्गठन व मुदतवाढ द्यावी, नवीन पीककर्ज अल्प व्याजदरात उपलब्ध करावे, कृषीपंपांच्या वीजबिलात सवलत द्यावी आणि वीजपुरवठा सुरळीत ठेवावा, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय चारा डेपो, पिण्याच्या पाण्यासाठी टँकर, रोजगार हमीची कामे, पुढील हंगामासाठी बियाणे-खते-कीटकनाशके सवलतीत देणे तसेच शेततळी, विहिरी, कूपनलिका व ठिबक सिंचनासाठी विशेष मदत देण्याची मागणी करण्यात आली. दुष्काळाची कागदोपत्री नव्हे तर प्रत्यक्ष पाहणी करून शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष विलास भैया शेळके, विधानसभा अध्यक्ष विनोद तांबे पाटील, युवा नेते किशोर तावरे, सेवादल जिल्हाध्यक्ष अनिल हजारे, योगेश जोशी, दीपक हजारे, दिलीप हजारे, सुनील काकडे, संजय सदावर्ते, बाळासाहेब हजारे, ऋषी चौधरी, बंटी हजारे आदी उपस्थित होते.

# श्री तुळजाभवानी मातेच्या पालखीचा २०० वर्षे जुना पारंपरिक दांडा राहुरीकडे रवाना

## आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते बुऱ्हानगर येथे विधिवत पूजा व आरती । पुरातन व पारंपरिक वारसा जोपासत महान संस्कृतीचे दर्शन घडविण्याचे काम – आमदार अक्षय कर्डिले

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीच्या आगामी नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र बुऱ्हानगर येथून श्री तुळजाभवानी मातेच्या पालखीचा सुमारे २०० वर्षे जुना ऐतिहासिक व पारंपरिक दांडा राहुरीकडे रवाना करण्यात आला. बुऱ्हानगर येथील श्री तुळजाभवानी देवी मंदिरात भाद्रपद शुद्ध प्रतिपदेच्या शुभमुहूर्तावर या दांड्याची आमदार अक्षय कर्डिले व भगत कुटुंबीयांच्या वतीने विधिवत पूजा व आरती करण्यात आली. त्यानंतर 'आई राजा उदो उदो'च्या जयघोषात हा पारंपरिक दांडा नव्या पालखीच्या निर्मितीसाठी राहुरी येथील सुतार व लोहार कारागिरांकडे पाठविण्यात आला.

यावेळी आमदार अक्षय कर्डिले, संदीप कर्डिले, सरपंच रावसाहेब कर्डिले, उपसरपंच जालिंदर जाधव, ग्रामपंचायत सदस्य सुशील तापकीरे, तुळजाभवानी मातेचे मुख्य पुजारी व पलंग पालखीचे मुख्य पुजारी, सुदाम भगत, ज्ञानेश्वर भगत, शिवराम भगत, सागर भगत, संतोष भगत, देविदास भगत, निलेश भगत, संदीप भगत, मंगेश भगत, वसंत भगत, दीपक भगत, योगेश भगत, रवींद्र भगत, गणेश मेजर भगत, गजानन भगत, महेश भगत, महेंद्र भगत, देवराम भगत, सोमनाथ भगत, भाऊ भगत, प्रवीण भगत, निखिल भगत, भूषण भगत, कृष्णा भगत, ओम् भगत, अरविंद भगत, समर्थ भगत, सिद्धार्थ भगत, विराज भगत, सोहम भगत, यश भगत, शिवकुमार भगत, दुर्गेश भगत, प्रणव भगत, गौरव भगत, विश्व भगत, शौर्य भगत, आरव भगत, अर्णव भगत, गणेश भगत, सार्थक भगत, जीवन भगत, शिवतेज भगत, विशाल भगत, वैभव भगत, शुभम भगत आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार अक्षय कर्डिले म्हणाले की, महाराष्ट्र ही साधुसंतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी असून, या भूमीला हजारो वर्षांची धार्मिक व आध्यात्मिक परंपरा लाभली आहे. पुरातन व पारंपरिक वारसा जोपासत आपल्या महान संस्कृतीचे दर्शन घडविण्याचे काम अशा धार्मिक परंपरांच्या माध्यमातून होत असते. आजच्या युवा पिढीला धार्मिकता व आपल्या संस्कृतीची ओळख या माध्यमातून होत आहे.

श्री क्षेत्र बुऱ्हानगर येथील श्री तुळजाभवानी मातेचे मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान आहे. नवरात्र उत्सवातील तिसऱ्या माळेला येथे मोठी यात्रा भरते. राज्यभरातून भाविक देवीच्या दर्शनासाठी येत असतात. पालखीचा पारंपरिक दांडा हा ऐतिहासिक परंपरेचा भाग असून, राहुरी येथे पालखी तयार झाल्यानंतर राहुरी, नगर व पारनेर तालुक्यातील विविध गावांमध्ये पालखी सोहळ्यानिमित्त यात्रा व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, असे आमदार अक्षय कर्डिले यांनी सांगितले.

सागर भगत म्हणाले की, तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी देवीच्या पालखीचा मान गेल्या अनेक वर्षांपासून बुऱ्हानगर येथील भगत कुटुंबीयांकडे आहे. पालखीचा हा ऐतिहासिक दांडा गेल्या २०० वर्षांपासून जतन करण्यात आला आहे. दरवर्षी केवळ पालखीचा पाळणा नव्याने तयार केला जातो.

पाळणा तयार झाल्यानंतर २६ सप्टेंबर २०२६ पासून पालखी सोहळ्याला सुरुवात होईल. राहुरी, पारनेर व नगर तालुक्यातील सुमारे ४० गावांमध्ये पालखी जाऊन यात्रा व धार्मिक उत्सव संपन्न होतात. या सोहळ्याला हजारो भाविक दर्शनासाठी उपस्थित राहतात. नवरात्र उत्सवाच्या तिसऱ्या माळेला पालखी बुऱ्हानगर येथे परत येईल व त्यानंतर तुळजापूरकडे रवाना होईल.

# हस्तीमलजी मुनोत यांना जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय सन्मान जाहीर

## सामाजिक क्षेत्रातील प्रदीर्घ योगदानाचा गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** श्रमण संघीय चतुर्थ पट्टधर आचार्य सम्राट पूज्य डॉ. शिवमुनीजी म.सा. यांचा ८५ वा जन्मोत्सव आणि श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स, नवी दिल्लीचा वार्षिकोत्सव राष्ट्रीय अध्यक्ष अतुल जैन यांच्या नेतृत्वाखाली दि. १८ सप्टेंबर २०२६ रोजी बलेश्वर सुरत (गुजरात) येथे होणार आहे. यावेळी अहिल्यानगर येथील जैन श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमलजी मुनोत यांना जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय सन्मान २०२६ ने गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय आयोजन समितीचे मुख्य संयोजक जसवंत जैन यांनी दिली.

जैन कॉन्फरन्सच्या वार्षिकोत्सवात संघटनात्मक बैठक, सन्मान सोहळा आणि भव्य भक्ती संध्या असे कार्यक्रम होणार आहेत. हस्तीमलजी मुनोत यांचा समाजकार्यातील प्रदीर्घ योगदानाबद्दल राष्ट्रीय सन्मान करण्यात येणार आहे. हस्तीमलजी मुनोत यांना केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते सहकारयात्री उपाधीने गौरविण्यात आले आहे. हस्तीमलजी मुनोत हे अहिल्यानगर श्वेतांबर स्थानकवासी जैन संघाचे ३४ वर्षांपासून अध्यक्ष असून श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे ३५वर्षांपासून अध्यक्ष आहेत. आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्यावर नितांत श्रद्धा असल्याने ते मानव सेवा हीच ईश्वर सेवा मानून समाजासाठी भरीव योगदान देत असतात. धार्मिक परीक्षा बोर्डचे ते उपाध्यक्ष आहेत. आचार्यश्रींच्या देशभरातून येणाऱ्या भक्तांसाठी भक्त निवास, परमार्थिक दवाखाना, आनंदधाम येथे आचार्य भगवंतांचा स्मृती कक्ष अशा अनेक कार्यात ते सातत्याने योगदान देत आहेत.

विहारासाठी आलेल्या साधूसाध्वीजींची सेवा करणे, त्यांच्या सान्निध्याचा, मार्गदर्शनाचा लाभ अधिकाधिक भाविकांना मिळवून देणे यासाठी ते विशेष प्रयत्न करतात. धार्मिक परीक्षा बोर्ड, आनंदधाम येथे होणाऱ्या धार्मिक सोहळ्यावेळच्या नियोजनात त्यांचा सक्रिय सहभाग असतो. विद्यमान आचार्य डॉ. शिवमुनीजी म.सा. यांच्या संस्थेचे ते मार्गदर्शक सल्लागार आहेत. चांदमल मुनोत ट्रस्टचे ते अध्यक्ष असून या ट्रस्टच्या माध्यमातून मागील २५ वर्षांपासून अहिल्या नगर व पुणे येथे मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन करण्यात येते. हजारो गरजूंनी या शिबिराचा लाभ घेतला आहे.

पांजरापोळ गोरक्षण संस्थेच्या माध्यमातून ते गेली ४५ वर्षे गोरक्षण व गोसेवेचे भरीव कार्य करत आहेत. जिल्हा कुष्ठरोग समिती, राष्ट्रभाषा शिक्षा मंडळ अशा अनेक संस्थांचे ते पदाधिकारी आहेत. वृध्दाश्रमाचे ते विश्वस्त होते. अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष होते..

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

# गुटखा-माव्याच्या अवैध धंद्यांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेची धडक मोहीम

## १३ आरोपींवर गुन्हे, ३ लाखांचा मुद्देमाल जप्त




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** जिल्ह्यात अवैध गुटखा, मावा आणि सुगंधित तंबाखूच्या विक्रीविरोधात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने धडक मोहीम राबवली. तोफखाना, शेवगाव आणि श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाच ठिकाणी छापे टाकून १३ जणांविरोधात ५ गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण ३ लाख ५ हजार ७५६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिलेल्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अनंत सालगुडे, कृष्णकुमार सेदवाड व पोलीस अंमलदारांची तीन विशेष पथके तयार करण्यात आली.

या पथकांनी १३ व १४ सप्टेंबर रोजी गुप्त माहितीच्या आधारे तोफखाना, शेवगाव आणि श्रीरामपूर परिसरात सुगंधी तंबाखू व गुटख्याची निर्मिती तसेच विक्री करणाऱ्या अड्ड्यांवर एकाच वेळी छापे टाकले. या कारवाईत पोलिसांनी तोफखाना हद्दीतून सर्वाधिक २ लाख ७२० रुपयांचा, तर शेवगाव व श्रीरामपूर हद्दीतून उर्वरित असा एकूण ३ लाख ५ हजारांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हे नोंदवून तौकीर देशमुख, अश्पाक शेख, अभिषेक साळवे, कृष्णा पवार, गोपाल पवार, कामरान तांबोळी, निलेश वदक आणि अमीर खान यांच्यासह इतर आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. यातील फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

# आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सचिन लगड यांचा गौरव

## गुणवत्तावाढीसह विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्यपूर्ण योगदानाची दखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर-** छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे निरीक्षक तथा यशवंतराव चव्हाण विद्यालय, घारगावचे विद्यमान मुख्याध्यापक सचिन सयाजीराव लगड यांना अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षण विभाग आणि अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'आदर्श गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ, प्रामाणिक आणि विद्यार्थी केंद्रित कार्याची दखल घेत त्यांचा हा सन्मान करण्यात आला.

सचिन लगड यांनी ९ डिसेंबर १९९१ रोजी ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेच्या श्री. रामेश्वर विद्यालय, चिखली येथून आपल्या शैक्षणिक सेवेला सुरुवात केली. अतिशय दुर्गम व छोट्या गावात विद्यालयाच्या स्थापनेपासून त्याच्या शैक्षणिक विकासात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. प्रतिकूल परिस्थितीतही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीला प्राधान्य देत त्यांनी शाळेच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न केले.

१९९५ मध्ये विनाअनुदानित कृती समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून नागपूर येथे विनाअनुदानित शाळांतील सेवकांच्या प्रश्नांसाठी आयोजित करण्यात आलेल्या आंदोलनात लगड यांनी सक्रिय सहभाग घेतला. या आंदोलनातून विनाअनुदानित शाळांमधील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी सुमारे ८७ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होण्यास मदत झाली. शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांसाठी त्यांनी घेतलेल्या या भूमिकेची दखल संस्थेने घेत त्यांची छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या निरीक्षकपदी नियुक्ती केली.

सध्या यशवंतराव चव्हाण विद्यालय, घारगाव येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असताना लगड यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीवर भर दिला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील दोन विद्यार्थी आयपीएस झाले असून, अनेक विद्यार्थ्यांनी एमपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविले आहे. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून समाज, पालक आणि संस्था यांना सोबत घेत गुणवत्तावाढीचा ध्यास त्यांनी कायम जपला. शिक्षण क्षेत्रातील बदलती आव्हाने स्वीकारत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. केवळ शैक्षणिक कामकाजापुरते मर्यादित न राहता शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांनाही त्यांनी आपुलकीने हाताळले. विविध प्रश्नांचा पाठपुरावा करून संस्था व जिल्हा पातळीवर ते मार्गी लावण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.त्यामुळे लगड हे केवळ मुख्याध्यापक म्हणून नव्हे, तर मार्गदर्शक शिक्षक, कुशल प्रशासक, सहकाऱ्यांचा आधार आणि जिव्हाळ्याचा सहकारी म्हणून शैक्षणिक क्षेत्रात स्थान निर्माण करण्यात यशस्वी ठरले आहेत. त्यांच्या प्रामाणिक कार्याची, दूरदृष्टीची, नेतृत्वगुणांची आणि शिक्षणाप्रती असलेल्या निष्ठेची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.सचिन लगड हे कोळगाव येथील आबासाहेब लगड (सरदार) यांच्या परिवारातील असून, माजी श्रीगोंदा तालुका पंचायत समिती सभापती सयाजीराव लगड यांचे सुपुत्र आहेत. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल संस्थेच्या अध्यक्षा अनुराधाताई राजेंद्र नागवडे, सचिव राजेंद्रदादा शिवाजीराव नागवडे, निरीक्षक बी. के. लगड, तसेच ज्ञानदीप, छत्रपती व तुळजाभवानी संस्थेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि कोळगाव ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# ढोल-ताशांचा गजर, भक्तीचा साज शेवगाव नगरीत 'बाप्पा' विराजमान

## सहकुटुंब भक्तिभावाने गणरायाचे आगमन; शहरासह तालुक्यात उत्साहाला उधाण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव-** विघ्नहर्त्या श्री गणरायाच्या आगमनाने आज शेवगाव शहरासह संपूर्ण तालुका भक्तीमय वातावरणाने भारावून गेला. सकाळपासूनच घराघरांत गणरायाच्या स्वागताची लगबग सुरू होती. फुलांची आरास, आकर्षक सजावट, मंगलमय वातावरण आणि 'गणपती बाप्पा मोरया' च्या जयघोषात अनेक कुटुंबांनी लाडक्या बाप्पाची मोठ्या भक्तिभावाने प्रतिष्ठापना केली.

याच भक्तिमय वातावरणात शेवगाव येथील अनेक कुटुंबानेही मोठ्या श्रद्धा आणि उत्साहाने श्री गणरायाचे सहकुटुंब आगमन केले. बाप्पाला घरी आणताना कुटुंबीयांनी अनवाणी पायी चालत, चप्पल न घालता मनोभावे गणरायाचे स्वागत केले. बाप्पाच्या आगमनाचा आनंद, भक्ती आणि समाधान कुटुंबातील प्रत्येकाच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहताना दिसून आले. कुटुंबातील एकोप्याने आणि श्रद्धेने साकारलेला हा क्षण गणेशोत्सवातील भावनिक चित्र ठरला. शेवगाव शहरातील विविध भागांसह ग्रामीण भागातही गणेशोत्सवाचा उत्साह ओसंडून वाहत होता. लहानांपासून



ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकाच्या मनात बाप्पाच्या आगमनाचा आनंद आणि भक्तीची भावना दिसून आली. अनेक मंडळांनी आकर्षक सजावट करून गणरायाचे स्वागत केले, तर घरगुती गणपतींच्या प्रतिष्ठापनेतून कुटुंबातील प्रेम, संस्कार आणि एकोप्याचे सुंदर दर्शन घडले.

गणरायाचे आगमन म्हणजे केवळ उत्सव नव्हे, तर आस्था, संस्कार, कुटुंबातील प्रेम आणि सुख-समृद्धीची नव्याने केलेली प्रार्थना आहे. याच भावनेने शेवगावकरांनी आज भक्तिभावाने गणरायाचे स्वागत केले. भक्तीच्या या मंगलमय वातावरणात शेवगाव नगरीत एकच जयघोष घुमला.

# मनपा आरोग्य समितीच्या अध्यक्षपदी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे यांची निवड

## महापौर ज्योतीताई गाडे व उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** अहिल्यानगर महानगरपालिका विधानसभा मतदारसंघातील एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची पहिली बैठक आमदार संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीमध्ये नगरसेवक डॉक्टर सागर बोरुडे यांची अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. या निवडीबद्दल महापौर ज्योतीताई गाडे व उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते डॉक्टर सागर बोरुडे यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप, नगरसेवक निखिल वारे, नगरसेवक दत्ता गाडळकर, नगरसेवक महेश पावले, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब बारस्कर, बाळासाहेब पवार, रोहन सानप, मनोज ताठे, सुशांत जाधव आदी उपस्थित होते. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, महापालिकेच्या कामकाजामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी तसेच प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयातून नागरिकांची कामे जलद गतीने मार्गी लागावीत, यासाठी नगरसेवक डॉक्टर सागर बोरुडे यांची मनपा आरोग्य समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

डॉक्टर सागर बोरुडे यांच्या माध्यमातून शहरातील आरोग्यसेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यास मदत होईल. ते वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असून त्यांचे चांगले काम आहे. कोविडच्या काळामध्येही त्यांनी महापालिकेच्या माध्यमातून चांगली रुग्णसेवा केली होती. त्यांच्या अनुभवाचा उपयोग निश्चितच महापालिकेच्या आरोग्य विभागाला होईल, असा विश्वास महापौर ज्योतीताई गाडे यांनी व्यक्त केला.

नगरसेवक डॉक्टर सागर बोरुडे म्हणाले की, माझ्यावर मनपा आरोग्य समितीची जबाबदारी आमदार संग्राम जगताप व महापौर ज्योतीताई गाडे यांनी सोपविली आहे. या पदाच्या माध्यमातून नक्कीच न्याय देण्याचा प्रयत्न करणार असून माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी काम करणार आहे.

अहिल्यानगरकरांना अधिकाधिक आरोग्यसेवा जलद गतीने उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन समन्वयाने काम करण्यात येईल. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नांना प्राधान्य देऊन आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न राहील, असे डॉक्टर सागर बोरुडे यांनी सांगितले.

# ओबीसींची स्वतंत्र जातनिहाय जनगणना करावी; स्वतंत्र रकाना उपलब्ध करून द्या

## काँग्रेसच्या ओबीसी विभागाच्या शिष्टमंडळाचे राज्यपाल यांना निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** देशात सुरू असलेल्या जनगणना प्रक्रियेत ओबीसी समाजाची जातनिहाय स्वतंत्र नोंद करण्यासाठी जनगणना पत्रिकेत स्वतंत्र रकाना उपलब्ध करून द्यावा, तसेच ओबीसी समाजाच्या लोकसंख्येची अचूक नोंद करावी,महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत दयावी या प्रमुख मागणीसाठी काँग्रेसच्या ओबीसी विभागाच्या शिष्टमंडळाने मुंबई राजभवन येथे महाराष्ट्राचे राज्यपाल विष्णूजी देव वर्मा यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. काँग्रेसचे माजी विधानसभा अध्यक्ष आमदार नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले, यावेळी काँग्रेसच्य राष्ट्रीय समन्वयक मंगलताई भुजबळ, राष्ट्रीय ओबीसी उपाध्यक्ष भानुदास माळी,विमल कटरे, ॲड शुभांगी शेरेकर, धनराज राठोड, अनंत मोहोळ, जीवन चाकणकर, श्रावणकुमार रेपणवार, अशोक खलाने, शंभू म्हात्रे, जितेश विशे, विनोद अहिरकर, राजीव गुट्टे, विजय राऊत, शैलेश राऊत, विजय घुटे यांच्यासहीत ३२ ओबीसी पदाधिकारी उपस्थित होते.

जनगणना प्रक्रियेत ओबीसी समाजासाठी स्वतंत्र रकाना नसल्याबाबत शिष्टमंडळाने तीव्र चिंता व्यक्त केली. अनुसूचित जाती-जमातीप्रमाणे ओबीसी समाजाचीही स्वतंत्रपणे जातनिहाय गणना करणे आवश्यक असून, ओबीसी समाजाच्या




हक्कांवर कोणताही अन्याय होऊ नये, अशी ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली.

ओबीसी समाजासोबत मोठा अन्याय होत असून, त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. गावागावांत ओबीसी समाजामध्ये या प्रश्नाबाबत जागृती निर्माण झाली आहे. शासनाने वेळीच दखल घेतली नाही, तर व्यापक जनआक्रोश निर्माण होऊन आंदोलनाची तीव्रता वाढू शकते, असा इशारा शिष्टमंडळाच्या वतीने देण्यात आला.

केंद्र सरकारने ओबीसी समाजाच्या जातनिहाय जनगणनेबाबत दिलेला शब्द पाळावा. केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना जाहीर केली असली, तरी जनगणनेच्या प्रक्रियेत ओबीसी समाजाची जातनिहाय स्वतंत्र आणि अचूक नोंद होणे आवश्यक आहे. ओबीसी समाजासाठी स्वतंत्र रकाना/कॉलम ठेवून प्रत्येक जात व सामाजिक घटकाची लोकसंख्या अधिकृतपणे नोंदवावी, अशी काँग्रेस पक्षाची ठाम मागणी आहे. ओबीसी समाजाची अचूक लोकसंख्या, सामाजिक-शैक्षणिक स्थिती आणि आर्थिक परिस्थितीची अधिकृत माहिती उपलब्ध झाली तरच आरक्षण, शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्ती, रोजगार, वसतिगृहे, कौशल्य विकास आणि विविध कल्याणकारी योजनांचे योग्य नियोजन करता येईल. जातनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते मा. श्री. राहुल गांधी यांनी पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवले आहे. बिहार आणि तेलंगणाप्रमाणे महाराष्ट्रासह देशभरात पारदर्शक पद्धतीने जातनिहाय जनगणना करण्याची मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

यासोबतच विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रासह राज्यातील अनेक भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीकडेही काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने महामहिम राज्यपाल महोदयांचे लक्ष वेधले.

पावसाअभावी पिके करपली आहेत, शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, शेतमजुरांच्या हाताला काम नाही आणि जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात तातडीने दुष्काळ- जाहीर करून शेतकरी व शेतमजुरांना भरीव आर्थिक मदत द्यावी, जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने केली.

# आयकॉन पॅराडाईजमध्ये शाडू मातीच्या गणेशमूर्तींची कार्यशाळा

## विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती; प्रदूषणमुक्त गणेशोत्सवाचा संकल्प



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण-** विशाल बहुउद्देशीय प्रतिष्ठान संचालित आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूलमध्ये 'शनिवार दप्तरमुक्त शाळा' उपक्रमांतर्गत शाडू मातीच्या पर्यावरणपूरक श्री गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा उत्साहात पार पडली.

मराठवाडा साहित्य परिषदेचे संचालक तथा संस्थेचे अध्यक्ष प्रा. संतोष पाटील तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्राचार्य आर. बी. रामावत यांच्या नेतृत्वाखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कलाशिक्षक राजेश्वर जमादार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत विविध आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या. यावेळी प्राचार्य आर. बी. रामावत यांनी शाडू मातीच्या गणेशमूर्तींचे पर्यावरणीय महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. शाडूची माती पाण्यात सहज विरघळत असल्याने विसर्जनानंतर तिचा पर्यावरणपूरक पद्धतीने उपयोग करता येतो, असे त्यांनी सांगितले. कार्यशाळेतून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांनी यंदाचा गणेशोत्सव शाडू मातीच्या गणेशमूर्तींसह प्रदूषणमुक्त पद्धतीने साजरा करण्याचा संकल्प केला. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# केडगावमध्ये 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियानांतर्गत जनजागृती कार्यक्रम

## महिलांचे कार्य सर्वच क्षेत्रात आदर्शवंत - आयुक्त यशवंत डांगे । आरोग्य विभाग व आशा सेविकांकडून सात आठवड्यांत ७ हजार घरांना भेटी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** शहरातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ व निरोगी राहावे, यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या माध्यमातून स्वच्छता अभियान तसेच 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात साप्ताहिक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींनी सादर केलेले स्वागतगीत व डेंगू जनजागृतीपर पथनाट्य नागरिकांच्या विशेष कौतुकास पात्र ठरले.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे यांनी घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी केली. तसेच परिसरात औषध व धूर फवारणी करण्यात आली. आरोग्य विभागातील कर्मचारी व आशा सेविकांच्या माध्यमातून 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियानांतर्गत सातव्या आठवड्यापर्यंत सुमारे ७ हजार घरांना भेटी देऊन पाणीसाठ्यांची तपासणी करण्यात आली आहे. साठविलेल्या पाण्यामध्ये डेंगूच्या डासांची उत्पत्ती होऊ नये, यासाठी अबेट औषध टाकण्यात येत असून विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

यावेळी बोलताना आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, अहिल्यानगर शहरातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे, यासाठी महापालिकेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी नागरिकांचे सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. लोकचळवळीच्या माध्यमातूनच 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियान यशस्वी होऊ शकते. पावसाळ्याच्या दिवसांत प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून परिसर स्वच्छ ठेवण्यास सुरुवात करावी. प्रत्येक घर स्वच्छ राहिल्यास संपूर्ण शहर स्वच्छ व सुंदर होण्यास वेळ लागणार नाही.

नागरिकांनी ओला व सुका कचरा वेगळा करून तो घंटागाडीतच टाकावा. काही नागरिक रस्त्यावर कचरा टाकतात. त्यामुळे साथीचे आजार पसरण्याची शक्यता निर्माण होते. नागरिकांनी कचरा रस्त्यावर न टाकता महापालिकेच्या घंटागाडीतच द्यावा, असे आवाहनही आयुक्त डांगे यांनी केले.



महाराणी ताराबाई कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींनी स्वागतगीत व पथनाट्याच्या माध्यमातून डेंगू आजाराबाबत नागरिकांमध्ये जनजागृती केली. विद्यार्थिनींच्या शिस्तबद्ध व प्रभावी सादरीकरणाचे आयुक्त डांगे यांनी कौतुक केले. महिलांचे कार्य सर्वच क्षेत्रांत आदर्शवत असून महिलांकडे कोणतेही काम अचूकपणे करण्याची क्षमता असते. आज महिला सर्वच क्षेत्रांत आघाडीवर आहेत. हवाई वाहतूक क्षेत्रातही महिलांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सिंदूर युद्धामध्येही एअर फोर्सचे नेतृत्व एका महिलेने केले होते, असे आयुक्त डांगे यांनी सांगितले.

महाराणी ताराबाई कन्या विद्यालयातील मुलींची शाळा पाहून आनंद झाला. विद्यार्थिनींनी शिस्तबद्ध पद्धतीने केलेले कार्यक्रमाचे सादरीकरण कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जनजागृती होत असल्याने 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियान यशस्वी होण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास आयुक्त यशवंत डांगे यांनी व्यक्त केला.

नगरसेविका वर्षाताई काकडे म्हणाल्या की, केडगाव उपनगरामध्ये चार ते पाच दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्यामुळे नागरिक मोठ्या प्रमाणात पाणीसाठा करून ठेवतात. त्यामुळे साथीचे आजार पसरण्याची शक्यता असते. मात्र, महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून घरोघरी जाऊन मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जात आहे. त्यामुळे डेंगू आजारावर आळा बसण्यास मदत होत आहे. आयुक्त यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेले 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियान कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉक्टर श्रीकृष्ण जोशी व डॉक्टर सुभाष बागले यांनी डेंगू आजाराबाबत घ्यावयाची काळजी, प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच नागरिकांनी पाणीसाठे झाकून ठेवण्याचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमास आयुक्त यशवंत डांगे, नगरसेविका वर्षाताई काकडे, डॉक्टर श्रीकृष्ण जोशी, डॉक्टर सुभाष बागले, डॉक्टर चंद्रवदन मिश्रा, आरोग्य अधिकारी डॉक्टर सतीश राजूरकर, प्रभाग अधिकारी सतीश कुंड, मुख्याध्यापिका वासंती धुमाळ, डॉक्टर सृष्टी बनसोडे, डॉक्टर गिरीश दळवी, संजयकुमार निकृड, शिक्षक, विद्यार्थिनी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉक्टर गिरीश दळवी व डॉक्टर सृष्टी बनसोडे यांनी केले. आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका वासंती धुमाळ यांनी मानले.

'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियानांतर्गत आरोग्य विभाग व आशा सेविकांकडून सात आठवड्यांत सुमारे ७ हजार घरांना भेटी देण्यात आल्या. यावेळी पाणीसाठ्यांची तपासणी, अबेट औषधाचा वापर, औषध फवारणी, धूर फवारणी आणि नागरिकांमध्ये डेंगूबाबत जनजागृती करण्यात आली.

